महाराष्ट्र शासन

क्रमांक: एनजीसी ३५९६/जनवि/[४४६/९६]/मशि-३.
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ११ ऑक्टोबर, १९९६.

प्रति,

कुलसचिव,

मुंबई विद्यापीठ, मुंबई.
पुणे विद्यापीठ, पुणे.
नागपूर विद्यापीठ, नागपूर.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
अमरावती विद्यापीठ, अमरावती.
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मुंबई.
स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
श्रीमती ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

विषय:- सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांचे नविन महाविद्यालय उघडण्यास परवानगी.

महोदय/महोदया,

सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून नविन महाविद्यालय उघडण्याबाबतीत शासनाकडे विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करुन, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२[५] नुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट-"अ" मधील व कलम ८२[५] च्या परंतुकान्वये सोबत जोडलेल्या परिशिष्ट-"ब" मधील संस्थांना त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व दर्शविलेल्या विद्याशाखेचे नविन महाविद्यालय सुरु करण्यास सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून पुढील अटींच्या अधीन राहून शासन परवानगी देत आहे.

१] सदर महाविद्यालयांना देण्यात आलेली परवानगी सध्या विना अनुदान तत्वावर असून, शासन निर्णय क्रमांक: एनजीसी-२०९१/[३५६७] विशि-३अ, दिनांक ८-८-१९९१ अन्वये लागू करण्यात आलेल्या अनुदान सूत्रानुसार व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या अनुदान संदर्भातील शासन निर्णयाच्या अटींच्या अधिन राहून या महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यात येईल.

२] महाविद्यालयांना ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात खाली दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश घेता. तरच वर्ग, सन १९९६-९७ पासून सुरु करावा.

अ] शहरी विभाग - ६०
ब] आदिवासी विभाग - ४०
क] ग्रामीण विभाग - ५०
ड] महिला महाविद्यालय - ५०

तसेच, सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेच्या कमीत कमी खालीलप्रमाणे विद्यार्थी बसणे आवश्यक आहे,

अ] शहरी विभाग - ५०
ब] आदिवासी विभाग - ३०
क] ग्रामीण विभाग - ४०
ड] महिला महाविद्यालय - ४०

३. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदीनुसार संलग्नीकरण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने तात्काळ करावी व पूर्तता अहवाल संचालक[उ. शि. ], महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित करावा.

४. विद्यापीठाने शिफारस केलेल्या संस्थांपैकी ज्या-ज्या संस्थांच्या प्रस्तावांना शासनाची मंजुरी प्रदान केलेली नाही, अशा संबंधित संस्थांना त्यांचा प्रस्ताव शासनाने नामंजूर केला असल्याचे विद्यापीठ स्तरावरून परस्पर कळविण्यात यावे.

आपला विश्वासू,

[ म.अ. सरपोतदार ]
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] शिक्षण संचालक[उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] विभागीय सह संचालक[उ. शि. ], मुंबई विभाग, मुंबई.
३] अध्यक्ष/सचिव, यादीतील सर्व संस्था.
४] खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५] खाजगी सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६] खाजगी सचिव[मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण]
७] खाजगी सचिव[राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण]
८] स्वीय सहाय्यक[सचिव, उच्च व तंत्रशिक्षण]
९] निवड नस्ती मशि-३.

## - परिशिष्ठ-"ब" -

शासन पत्र क्रमांक: एनजीसी-३५९६/मवि/[४४६/९६]/मशि-३, दिनांक ११ ऑक्टोबर, १९९६ अन्वये महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ८२[५] च्या परंतुकान्वये तुलनात्मकदृष्ट्या सक्षम ठरलेल्या संस्थांना नवीन महाविद्यालये सुरु करण्यास परवानगी दिलेल्या संस्थांची यादी.

| अ.क्र. १. | विद्यापीठ क्षेत्र २. | संस्थेचे नांव ३. | ठिकाण ४. | विद्याशाखा ५. |
|---|---|---|---|---|
| १] | नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १. समाजोन्नती बहु-उद्देशिय संस्था, विमूर, जि. चंद्रपूर. | भिसी, जि. चंद्रपूर. | कला व वाणिज्य. |
| | | २. सिंधु नवयुवक मंडळ, जरीपटका, जि. नागपूर. | जरीपटका, नागपूर. | कला [महिला] |
| २] | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. | १. भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाजोगाई. | माजलगाव | कला, वाणिज्य व विज्ञान. |
| ३] | अमरावती विद्यापीठ, अमरावती. | १. राजे संभाजी महाराज शिक्षण संस्था, कॉटन मार्केट, जि. अमरावती. | वरुड, जि. अमरावती. | कला व वाणिज्य [महिला] |
| | | २. धर्मवीर दिलीपराव रहाटे बहु-उद्देशिय शिक्षण संस्था, मेहकर, जि. बुलडाणा. | मेहकर, जि. बुलडाणा | कला व विज्ञान [महिला] |

- - - - - - - - - - - - - - -xxx- - - - - - - - - - - - - - -